


30 सप्टेंबरपूर्वी कर भरल्यास थेट 4 टक्के सवलत, लाभ घेण्यासाठी फक्त 7 दिवस बाकी

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 24/09/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 224 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# भारताला मतचोरीच्या संकटातून मुक्त करणं हीच मोठी देशभक्ती

## राहुल गांधी


>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



दिल्ली : काँग्रेस नेते राहुल गांधी हे मतचोरीचा मुद्दा सतत उपस्थित करत आहेत. त्यांनी आता मतचोरीचा संबंध बेरोजगारीशी जोडला आहे. बेरोजगारीवरूनभाजपा सरकारवर जोरदार निशाणा साधला. राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर तरुण आणि पोलिसांमधील संघर्ष दाखवणारा एक व्हिडीओ पोस्ट केला. व्हिडिओमध्ये केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडण्यात आलं आहे. "भारताला बेरोजगारी आणि मतचोरीच्या संकटातून मुक्त करणं ही आताची सर्वात मोठी देशभक्ती" असं म्हंटल आहे.राहुल यांनी ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केलं आहे. "भारतातील तरुणांसमोरील सर्वात मोठी समस्या बेरोजगारी आहे आणि त्याचा थेट संबंध मतचोरीशी आहे. जेव्हा एखादं सरकार जनतेचा विश्वास जिंकून सत्तेत येतं तेव्हा त्यांचं पहिलं कर्तव्य म्हणजे तरुणांना रोजगार आणि संधी उपलब्ध करून देणं. परंतु भाजपा प्रामाणिकपणे निवडणुका जिंकत नाही. ते मतं चोरून आणि संस्थांवर नियंत्रण ठेवून सत्तेत राहतात."बेरोजगारीवर हल्लाबोल करत राहुल गांधी पुढे म्हणाले, "बेरोजगारी ४५ वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली आहे. म्हणूनच नोकऱ्या कमी होत आहेत, भरती प्रक्रिया कोलमडल्या आहेत आणि तरुणांचं भविष्य अंधारात ढकललं जात आहे. म्हणूनच प्रत्येक परीक्षा पेपर फुटीच्या गोष्टींशी जोडली जाते आणि प्रत्येक भरती भ्रष्टाचाराने भरलेली असते. देशातील तरुण कठोर परिश्रम करतात, स्वप्न पाहतात आणि त्यांच्या भविष्यासाठी संघर्ष करतात.परंतु मोदी केवळ त्यांच्या स्वतःचा जनसंपर्क, सेलिब्रिटींच्या जाहिराती आणि अब्जाधीशांच्या नफ्यावर लक्ष केंद्रित करतात. तरुणांच्या आशा चिरडून टाकणं आणि त्यांना निराश करणं ही या सरकारची ओळख बनली आहे."

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सर्व यंत्रणा युद्धपातळीवर सज्ज – मुख्यमंत्री

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून राज्य सरकारने तातडीच्या मदतीसाठी यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत केली आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी असून घरे, शेती आणि जनावरांचे जिथे नुकसान झाले आहे तिथे आवश्यक त्या ठिकाणी निकषामध्ये शिथिलता आणून मदत केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आज मंत्रिमंडळ बैठकीत आढावा घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर त्यांनी माध्यमांना माहिती दिली.आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. यापैकी १८२९ कोटी रुपये जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आले असून येत्या ८ ते १० दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा होईल. तशा सूचना स्थानिक प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पूरग्रस्त भागांतील पंचनामे पूर्ण होताच तातडीने मदत पोहोचवली जात आहे.

ज्या तालुक्यांचे पंचनामे पूर्ण होतात, तिथे त्वरित आर्थिक सहाय्य वितरित केले जाते. एकत्रित शासन आदेशाची वाट न पाहता, पंचनामे येतील तसे जीआर काढण्यात येत आहेत. मदतकार्य कुठेही थांबलेले नाही . मृत्यू, जनावरांचे नुकसान, घरांचे नुकसान यांसारख्या दुर्दैवी घटनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मदत वितरित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

स्थानिक पातळीवरही नुकसानग्रस्तांना त्वरित दिलासा देण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सूट देण्यात आली असून, निधीची कमतरता भासणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.धाराशिव, अहिल्यानगर, धुळे, जळगाव, सोलापूर, बीड, परभणी आदी जिल्ह्यांत गेल्या काही दिवसांत अतिवृष्टीमुळे शेती आणि घरांचे मोठे नुकसान झाले.

या भागांत एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या १७ तुकड्या बचावकार्यात गुंतल्या आहेत. अनेकांना हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. स्थलांतरित नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, अन्नधान्य आणि निवाऱ्याची व्यवस्था सरकारने केली आहे.

पूरामुळे जमिनी खरडून गेल्याच्या तक्रारींवर सरकार सकारात्मकपणे मदत करेल.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 24/09/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# तृतीयपंथीयांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण योजनेस स्थायी समितीची मंजुरी

## महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत तृतीयपंथी घटकांच्या सक्षमीकरणासाठी व समाजात त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. याच अनुषंगाने तृतीयपंथी घटकांना चार चाकी हलके वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेला स्थायी समितीच्या आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे तृतीयपंथी घटकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पिंपरी चिंचवड महापालिका शाळांमध्ये शून्य कचरा प्रकल्प, स्वच्छ सन्मान सोहळा व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ ची पूर्वतयारी साठी प्रॉडक्शन मॅनेजमेंट कामकाज खर्चास मान्यता देणे, यशवंतराव स्मृती रुग्णालय येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत व त्या संदर्भातील शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक यांना अदा करणे, ब क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे या कामास मुदतवाढ देणे, नवीन जिजामाता रुग्णालय येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडील नोंदणीसाठी केलेल्या अर्जाची कंन्सेन्ट ऑथरायझेशन फी व तपासणीनंतर महामंडळाकडून कळविलेल्या पेनल चार्जेस भरणे, नवीन जिजामाता रुग्णालयासाठी लिथियम पॉलिमर बॅटरी साहित्य खरेदी करणे, प्रभाग क्रमांक २ कुदळवाडी परिसरातील डीपी रस्ते विकसित करण्यासाठी चालू विकास कामांच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणे, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात महापालिकेतर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी डुडूळगाव येथे निवासी गाळे बांधणे यासह विविध ३९ विषयांना मान्यता देण्यात आली.

याशिवाय स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांच्याकडील ठराव महापालिका सी एस आर अंतर्गत नोंदणी करण्यास मान्यता देणे, तृतीयपंथी घटकांना चार चाकी हलके वाहन चालविण्याच्या ड्रायव्हिंग प्रशिक्षण योजना राबविणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आता "बालसंस्कार"

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी- चिंचवड: पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजाणवी करण्यात येणार आहे.तसेच, गीता परिवार यांच्या वतीने शाळांमध्ये बालसंस्कार वर्ग होणार आहेत.भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्याला प्रशासनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.आमदार लांडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांना एक सक्षम आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) मधील "बॅगलेस शनिवार" या संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गीता परिवाराच्या माध्यमातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना प्रभावी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. "शिक्षकांना विविध कार्यशाळा आणि प्रशिक्षण देऊन त्यांना विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव टाकण्यासाठी सक्षम करणे महत्त्वाचे आहे. यासाठी गीता परिवारचे प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त ठरू शकतात. या कार्यक्रमांमध्ये योगसोपान, सूर्यनमस्कार, प्रज्ञासंवर्धन, स्वच्छता अभियान, विज्ञान प्रयोग इत्यादी बाबींचा समावेश केला जाऊ शकतो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल आणि शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल.वास्तविक, तर्कसंगत विचार आणि कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी कृती असण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. यानुषंगाने "आनंददायी शनिवार" हा उपक्रम राज्य मंडळाच्या सर्व शाळामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी या इयत्तांसाठी राबविल्यास विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल, त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होईल.

तसेच विद्यार्थ्यांच्या गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होईल, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जाऊन त्यांचे उत्तम अध्ययन व्हावे या हेतूने राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी "आनंददायी शनिवार" हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

# प्रेमविवाह केल्याने तरुणाचा कोयत्याने वार करुन खून




>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : चिंचवड, बिजलीनगर येथे आठ दिवसांपूर्वी झालेल्या वादातून आणि प्रेमविवाह केल्याच्या रागातून एका तरुणाचा कोयत्याने वार करुन खून करण्यात आला. वैभव भागवत थोरात (वय २५, रा. नागसेननगर झोपडपट्टी, चिंचवड) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणात त्याच्या आईने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांना अटक करण्यात आली असून एका अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीच्या मुलाने आरोपीच्या बहिणीबरोबर प्रेमविवाह केला होता. या कारणामुळे आणि आठ दिवसांपूर्वी झालेल्या भांडणामुळे आरोपी चिडून होते. मंगळवारी दुपारी वैभववर आरोपींनी कोयत्याने हल्ला केला. त्यांनी त्याच्या डोक्यावर, दोन्ही हातांवर, नाकावर, तोंडावर आणि शरीरावर अनेक ठिकाणी वार करून त्याला ठार मारले. चिंचवड पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.आई, बहिणींकडून मानसिक छळ, एकाची आत्महत्या आई आणि बहिणींकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तळेगाव दाभाडे येथे घडली.याप्रकरणी महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीचे सासरे यांच्याकडून कर्नाटक येथील बंगला 'गिफ्ट डिड' करून घेतला. फिर्यादी यांचे सासरे शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम नसताना त्यांच्याकडून 'गिफ्ट डिड' करून तो बंगला विकला. त्यातून आलेले पैसे आरोपींनी फिर्यादीच्या पतीला न देता त्यांच्या विरोधात पोलिसात खोट्या तक्रारी दिल्या. त्यांना मानसिक आणि शारीरिक त्रास देऊन त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. तळेगाव दाभाडे पोलीस तपास करत आहेत.

# सेवानिवृत्त महिलेची एक कोटीची फसवणूक




पिंपरी : वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि कुरियर कंपनीचे अधिकारी असल्याचे भासवून पार्सलमध्ये अमली पदार्थ असल्याचे सांगून शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या ६५ वर्षीय महिलेची एक कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

ही घटना ३ ते ११ सप्टेंबर या कालावधीत पिंपरी-चिंचवडमध्ये ऑनलाइन माध्यमातून घडल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात सायबर पोलीस ठाण्यात एका ६५ वर्षीय महिलेने तक्रार दाखल केली आहे.

त्यानुसार दोन बँक खातेधारकांसह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे यांनी माहिती दिली.फिर्यादी महिला या शासकीय सेवेतून निवृत्त झाल्या आहेत.

त्यांनी पार्सल मागविले होते. पार्सलमध्ये कागदपत्रे, लॅपटॉप आणि अमली पदार्थ सापडले असल्याचे सांगून आरोपींनी फिर्यादीला धमकावले. अटक करण्याची भीती दाखवली.

फिर्यादीला बँक खात्यांवर एक कोटी रुपये जमा करण्यास भाग पाडले.

पैसे घेतल्यानंतर आरोपींनी कोणतीही रक्कम परत न करता फसवणूक केली. सायबर पोलीस तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 24/09/२०२5

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 30 सप्टेंबरपूर्वी कर भरल्यास थेट 4 टक्के सवलत, लाभ घेण्यासाठी फक्त 7 दिवस बाकी

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे मालमत्ताधारकांना कर भरण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत नागरिकांना मालमत्ता कर वेळेत भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. चालू वर्षासाठी मालमत्ता कर ऑनलाइन पद्धतीने ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी भरल्यास सामान्य करावर थेट चार टक्के सवलत मिळणार असून, हा लाभ घेण्यासाठी आता केवळ ७ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. ज्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी कर भरला नाही, त्यांना प्रत्येक महिन्याला दोन टक्के विलंब दंड भरावा लागणार आहे. त्यामुळे नागरिकांनी ३० सप्टेंबरपूर्वी त्वरित कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.१ एप्रिल २०२५ ते २२ सप्टेंबर दरम्यान महापालिकेला ५९५ कोटी २४ लाख रुपयांचा मालमत्ता कर संकलित झाला आहे. शहरात ७ लाख २६ हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक मालमत्ता असून, त्यापैकी ४ लाख ६१ हजार ५०३ मालमत्ताधारकांनी चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा केला आहे. यामध्ये ऑनलाइन मालमत्ता कर भरून सवलतीचा लाभ घेणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या ३ लाख ८० हजार ९४९ आहे.कर वसुलीसाठी १८ विभागीय कार्यालयांमार्फत कामकाज सुरू आहे. ऑनलाइन पद्धतीने किंवा ॲपच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.२५ हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांवर महापालिकेकडून कडक कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये बिगर निवासी मालमत्ताधारकांची वाहन जप्त करणे, नळ कनेक्शन खंडित करणे तसेच बिगर निवासी मालमत्ताधारकांची थकीत मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना कर आकारणी व कर संकलन आढावा बैठकीत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिल्या. महापालिकेच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा मालमत्ता करातून येतो आणि नागरिकांनी जबाबदारीने वेळेत कर भरल्यास शहरातील विकासकामांना वेग येईल. थकबाकीदारांनी विलंब न करता कर भरावा, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येणार, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# एकविरा माता देवी मंदिराच्या सोयसुविधेचा डॉ.नीलम गोऱ्हे यांनी घेतला आढावा

## एकविरा माता देवी मंदिराच्या पायथ्याशी सभा मंडपाकरिता १५ लाख रुपये देण्याची घोषणा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : एकविरा देवी मंदिराच्या पायथ्याशी भाविकांसाठी सभा मंडप उभारण्यासाठी विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या आमदार निधीतून १५ लाख रुपये देण्याची घोषणा केली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून 'नाहरकत प्रमाणपत्र' मिळताच सभा मंडपाचे काम तातडीने सुरु करण्यात येईल, असे एकविरा मातेचे दर्शन घेतल्यानंतर परिसरातील सोईसुविधाची पाहणीदरम्यान डॉ. गोरे यांनी सांगितले.डॉ. गोरे म्हणाल्या, मावळ तालुक्यातील कार्ला परिसरातील प्राचीन आणि पवित्र एकविरा माता मंदिर असून ते महाराष्ट्रातील महत्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. गोऱ्हे यांनी दिली.या परिसरात येणाऱ्या भाविकांकरिता वाहनतळ, खड्डेमय रस्ते आणि भाविकांच्या सोयीशी निगडित विविध कामे अद्यापही प्रलंबित आहेत. पीएमआरडीए व एमएमआरडीएच्यावतीने कामे करण्यात येत असून दोन्ही यंत्रणांमध्ये समन्वय साधून ही कामे वेगाने पूर्ण होणे आवश्यक आहे. याबाबत दिवाळीनंतर विधानभवनात विशेष बैठक घेऊन संबंधित विभागांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यात येईल; या परिसरातील प्रलंबित कामे गतीने पूर्ण करण्याकरिता प्रयत्न करण्यात येईल, असे डॉ. गोरे म्हणाल्या.नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थानाच्यावतीने करण्यात आलेल्या तयारीचा आढावा घेतला. पायरी मार्गावर रेलिंग बसविणे, मधमाशांच्या हल्ल्यापासून संरक्षण, लाकडी डोलीतून दर्शन घेणाऱ्या भक्तांची सुरक्षितता, आरोग्यसेवा सुविधा आणि पार्किंग समस्येचे निराकरण यावर विशेष भर देण्यात आला."भाविकांची सुरक्षितता आणि सोय ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे, त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व कामे करण्यात येतील, असेही डॉ. गोरे म्हणाल्या. यावेळी परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579

# नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रंगतदार चित्रकला स्पर्धा संपन्न

## संदीप काटे व अनिताताई संदीप काटे यांच्या वतीने चित्रकला स्पर्धा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




सेवा पंधरवडा २०२५ अंतर्गत भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पिंपळे सौदागर येथील द्वारका सनक्रेस्ट या सोसायटीतील फेज दोन आणि तीन येथेचित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला परिसरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या उपक्रमाचे आयोजन चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक तथा उद्योजक संदीप काटे व सामाजिक कार्यकर्त्या अनिताताई संदीप काटे यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रंगांच्या माध्यमातून स्वच्छ भारत, हरित भारत, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, राष्ट्रभक्ती, डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत यांसारख्या विविध सामाजिक व राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर चित्रे रेखाटली. काही विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा आलेख आपल्या कलाकृतीतून उलगडला.

यात सोहम सणस, आर्यश कांकणे, शर्विल चौधरी, श्रीजा खिस्ते,.रेवा मंदार गोडबोले,.तनिष्का पाटील, श्रीश कोकजे, पेहल काळे, मैत्री विकी गांधी, दुर्वा संदीप भामरे, मिहिरा जोशी, मनसिरथ कौर, अनिका कोठाउदय, वरद विकास रेपाळ, रितिका रोहन मंगळुरे, नीरव मनोज राडे या मुलांनी उल्लेखनीय चित्रे रेखाटलीस्पर्धा सुरू असताना पालक, शिक्षक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहान मुलांपासून ते उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांपर्यंत अनेक गटात स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक गटातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षकांनी निवडून बक्षिसे प्रदान केली.कार्यक्रमानंतर बोलताना आयोजक संदीप काटे म्हणाले की, "विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा तसेच समाजाशी निगडित विषयांबद्दल त्यांच्यात जाणिवा निर्माण व्हाव्यात हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू होता.

"तर, अनिताताई संदीप काटे यांनी सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवड्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून चित्रकला स्पर्धेतून मुलांना सामाजिक संदेश देण्याची संधी मिळाली.

"या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, राष्ट्रीय नेतृत्वाविषयी जागरूकता आणि समाजाशी नाते जोडण्याची भावना अधिक दृढ झाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकवर्ग, कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

# पीसीसीओईआर मध्ये आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी - पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे "सस्टेनेबिलिटी इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग अँड डिझाईन" या विषयावरील पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

थर्मॅक्स लि.चे इनोव्हेशन विभागाचे मुख्य डॉ. आर. एस. झा यांनी "बॉयलर डिझाईनमधील नवे ट्रेंड्स" या विषयावर मार्गदर्शन केले. बॉयलरची कार्यक्षमता शंभर टक्क्यांपेक्षा जास्त कशी वाढविता येऊ शकते, एच टू ओ गणितीय मॉडेलिंग व थर्मल सिस्टीम्सच्या सिम्युलेशनचा उपयोग, तसेच कंडेन्सिंग टेक्नॉलॉजी, लो-एनवोक्स बर्नर्स, व्हीओक्स, मल्टिपल हीट एक्स्चेंजर्स, टर्ब्युलेटर्स आणि व्हेअरेबल-प्रायमरी पायपिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी झा यांनी सविस्तर माहिती दिली.

द सॉल्ट सिस्टिम्सच्या संचालिका आदित्य माळिक यांनी "सस्टेनेबिलिटी" या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या काळातील रुपांझेल जर शाश्वत घरात राहिली. उदाहरणार्थ बांबूच्या घरात तर तिचा प्रिन्स चार्मिंग तिच्या मदतीला पोहोचणं अधिक सोपं होईल. याचप्रमाणे शाश्वतता ही आपल्या जीवनाला अधिक परिणामकारक आणि कार्यक्षम बनवू शकते, असे माळिक यांनी सांगितले. या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना व उपस्थित तज्ज्ञांना ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, शाश्वत डिझाईन व पर्यावरणपूरक उपाययोजना याविषयीची माहिती मिळाली. या परिषदेसाठी महाराष्ट्रासह विविध राज्यांमधून शंभर पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. संशोधन पत्र सादरीकरण, तांत्रिक सत्रे व चर्चासत्रांच्या माध्यमातून शाश्वतता व डिझाईन क्षेत्रातील नवनवीन संकल्पना मांडण्यात आल्या.

यावेळी प्राचार्य डॉ. हरिश तिवारी, विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579